

देवेंद्र फडणवीस घेणार मुख्यमंत्री पदाची शपथ

e Paper

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

वर्ष 3रे

मंगळवार दिनांक ०३/१२/२०२४

METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 4 || अंक 01 || RNI - MAHMAR51259 || metrocity924@gmail.com

# महायुतीच्या शपथविधी सोहळ्याचे महानियोजन

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

महाराष्ट्रातील विधानसभा निवडणूक संपली व दहा दिवस झाले निवडणुकीचा निकाल लागला तरीही महायुतीचे सरकार स्थापन झाले नाही मुख्यमंत्रीपदावरून अनेक तर्कवितर्क लढविले जात आहेत एकनाथ शिंदे हे काळजीवाहू मुख्यमंत्री म्हणून कार्यरत असून निवडणुकीनंतर महायुतीच्या सरकारमध्ये मंत्रीपदावरून नाराज असल्याचे बोलले जात आहे या नाराजीतूनच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आपल्या साताऱ्यातील दरेगावात दोन दिवस जाऊन बसले व काल परत येऊन पत्रकार परिषद घेत आपण भाजप पक्षश्रेष्ठींनी जो निर्णय घेतला आहे त्या निर्णयाच्या सोबत असून भाजप पक्षाचे 132 आमदार निवडून आले त्यांना जनतेचा कौल मिळाला असल्याने भाजप मुख्यमंत्रीपद घेण्यास माझी काही हरकत नाही शिवसेना पक्षाला कोणते मंत्रिपदे हवी आहेत ते चर्चेतून ठरविले जाईल असे काल एकनाथ शिंदे यांनी पत्रकार परिषदेतून सांगितले आहे तर अजित पवार यांनी निवडणुकीच्या निकालानंतरच भाजप पक्षाला आपला पाठिंबा दर्शविला आहे



## महायुतीचा शपथविधी सोहळा 5 डिसेंबर रोजी

भाजपचे पक्षश्रेष्ठी अमित शहा नरेंद्र मोदी व जेपी नड्डा यांनी महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या निकाला नंतर महायुतीच्या पक्षाची बैठक दिल्लीमध्ये बोलावली व या बैठकीत भाजपचाच मुख्यमंत्री होईल याबाबत चर्चा झाली या चर्चेत एकनाथ शिंदे व अजित पवार यांनी सहमती दर्शविल्यानंतर येत्या पाच डिसेंबर रोजी शपथविधी सोहळा संपन्न होणार असल्याचे जाहीर केले तसेच आता भाजपच्या गटनेतेपदी देवेंद्र फडणवीस यांची निवड करण्यात आली आहे मुख्यमंत्रीपदावर देवेंद्र फडणवीस हेच विराजमान होतील असेही सांगण्यात येत आहे तर शिवसेना शिंदे गट व अजित पवार यांच्या राष्ट्रवादीला उपमुख्यमंत्री पद दिले जाणार हा शपथविधी सोहळा येत्या पाच डिसेंबर रोजी मुंबई येथील आझाद मैदानावर संपन्न होत आहे या शपथविधी सोहळ्याची तयारी मोठ्या प्रमाणात करण्यात येत आहे महायुतीच्या शपथविधी सोहळ्याचे महानियोजन मोठ्या दिमाखात करण्यात येत असून या शपथविधी सोहळ्यास चाळीस हजार नागरिकांची उपस्थिती राहणार असल्याचे सांगण्यात येत आहे. या शपथविधी सोहळ्यास पंतप्रधान नरेंद्र मोदी गृहमंत्री अमित शहा व भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जेपी नड्डा उपस्थित राहणार आहेत. तसेच या शपथविधी सोहळ्यास 22 राज्यांचे मुख्यमंत्री हेही उपस्थित राहणार आहेत. 5 डिसेंबरला संध्याकाळी पाच वाजता हा शपथविधी सोहळा आजच मैदानावर संपन्न होत असताना या शपथविधी सोहळ्याकरिता सर्व केंद्रीय मंत्र्यांची ही उपस्थिती राहणार आहे. तसेच लाडक्या बहिणींनाही या शपथविधी सोहळ्यासाठी विशेष निमंत्रित करण्यात आले आहे. या निवडणुकीत लाडक्या बहिणींचा आशीर्वाद महायुतीच्या उमेदवारांना मिळाला आणि लाडक्या बहिणींमुळेच महायुतीला भरघोस मतदान झाले त्यामुळे लाडक्या बहिणींसाठी या शपथविधी सोहळ्यात विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. याचबरोबर विविध धर्माचे संत महंत या शपथविधी सोहळ्यासाठी उपस्थित राहणार आहेत या संत महंतांसाठी वेगळ्या स्टेजची उभारणी केली जाणार आहे या शपथविधी सोहळ्याकरिता दोन हजार व्ही व्ही आयपींच्या पासेस ची सोय करण्यात आली आहे.

तसेच तेरा विशेष ब्लॉक मध्ये लोकांच्या बसण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. मुख्य स्टेज आणि त्याच्या बाजूला दोन छोट्या स्टेज उभारण्यात येणार आहे. या महायुतीच्या शपथविधी सोहळ्याचे महानियोजन मोठ्या प्रमाणात करण्यात येत असून यावेळी मुख्यमंत्री सह दोन उपमुख्यमंत्री व महायुतीतील भाजप राष्ट्रवादी व शिवसेना पक्षाचे मंत्रीही शपथ घेणार आहेत.

# आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन, पुणेकरांचा उदंड प्रतिसाद

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

३८वी पुणे आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन रविवार १ डिसेंबर रोजी पहाटे ३.०० वाजता 'नाइट मॅरेथॉन' म्हणून सुरू झाल्यानंतर सकळी ६.३० वाजता १० कि.मी, सकाळी ७.०० वाजता ५ कि.मी आणि ३ कि.मी..व्हीलचेअर स्पर्धा पार पडल्या. यास पुणेकरांनी उदंड प्रतिसाद दिला.छत्रपती संभाजीनगरचे लाचलुचपत प्रतिबंधक अधीक्षक संदीप अटोळे व बीडचे उपअधीक्षक शंकर शिंदे यांनी १० कि.मी, राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांनी ५ कि.मी आणि पुणे आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन ट्रस्टचे अध्यक्ष अभय छाजेड यांनी व्हीलचेअर स्पर्धेला फ्लॅग ऑफ केला. त्यानंतर यास्पर्धांना प्रारंभ झाला.

पुणे आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन ३८ वर्षे चालू आहे हे कौतुकास्पद असून, पुणे महानगरपालिकेत सत्ताबदल झाला तरी या मॅरेथॉनला पुणे महानगरपालिकेचे सहकार्य कायम राहिले व राहील..मी पुण्याचा खासदार म्हणून पुणे आंतरराष्ट्रीय मॅरेथॉनला सदैव सहकार्य करेन, अशी ग्वाही केंद्रीय राज्यमंत्री व पुण्याचे खासदार मुरलीधर मोहोळ यांनी यानिमित्त दिली.




१० कि.मी पुरुष गटात प्रथम क्रमांक अभिनंदन सूर्यवंशी, द्वितीय क्रमांक युनूस शहा आणि तृतीय क्रमांक नरेंद्र सिंग यांना मिळाला. १० कि.मी महिला गटात प्रथम क्रमांक रिया धोत्रे, द्वितीय क्रमांक साक्षी भंडारी आणि तृतीय क्रमांक शिवानी चौरसिया यांना मिळाला. ५ कि.मी पुरुष गटात प्रथम क्रमांक सौरभ मेहरा, द्वितीय क्रमांक उत्तम पाटील आणि तृतीय क्रमांक ओमकार जाधव यांना मिळाला. ५ कि.मी महिला गटात प्रथम क्रमांक मानसी यादव, द्वितीय क्रमांक वैष्णवी सावंत आणि तृतीय क्रमांक प्रिया गुळवे यांना मिळाला.

३ कि.मी व्हीलचेअर स्पर्धेत पुरुष गटात प्रथम क्रमांक सोमनाथ यादव, द्वितीय क्रमांक गिरीश सव्वाशेर आणि तृतीय क्रमांक ओम शिंदे यांना मिळाला. ३ कि.मी. व्हीलचेअर महिला गटात प्रथम क्रमांक भाग्यश्री माझिरे, द्वितीय क्रमांक तृप्ती चोरडिया आणि तृतीय क्रमांक कोमल माळी यांना मिळाला. या सर्व स्पर्धा सणस ग्राऊंड येथून सुरू झाल्या. १० कि.मी. स्पर्धा सणस मैदान – सारसबाग – सिंहगड रस्तामार्गे हिंगणे चौक येथून परत, ५ कि.मी स्पर्धा सणस ग्राऊंड – सिंहगड रस्ता – पानमळा व परत आणि व्हीलचेअर स्पर्धा सणस मैदान – सिंहगड रस्ता तेथून दांडेकर पूल तेथून परत अशा संपन्न झाल्या. या संपूर्ण मार्गावर पुणेकरांनी मोठी गर्दी करून स्पर्धकांना टाळ्याचा कडकडाट करीत प्रोत्साहन दिले.

# महानगरपालिका निवडणूक लवकरच

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

विधानसभा निवडणूक संपली निकालही लागला जनतेने महायुतीला भरभरून मतदान केले परत एकदा महायुतीची सत्ता महाराष्ट्रात सत्ता स्थापना करणार आहे येत्या पाच डिसेंबर रोजी महायुतीचा शपथविधी सोहळा संपन्न होणार आहे लोकसभा निवडणुका झाल्या त्यानंतर आता विधानसभा निवडणुका झाल्या आता वेध लागले आहे ते महानगरपालिका निवडणुकीचे 2022 मते पिंपरी चिंचवड महानगरपालिका तसेच पुणे महानगरपालिकेच्या निवडणुका होणे अपेक्षित होते परंतु कोरोनाचा काळ



त्यानंतर ओबीसींचा आरक्षणाचा मुद्दा त्यानंतर अनेक अडचणी या महानगरपालिका निवडणुकीसाठी सांगितल्या गेल्या सुप्रीम कोर्टात हा वाद रेंगाळला आहे परंतु आता महानगरपालिकेच्या निवडणुका होणे अति आवश्यक असल्याने महायुती सरकार या महानगरपालिकेच्या निवडणुका येत्या फेब्रुवारी किंवा मार्चमध्ये होतील यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगण्यात येत आहे अडीच ते तीन वर्षापासून महानगरपालिकेवर प्रशासनाचा कारभार सुरू असल्याने सामान्य जनतेलाही महानगरपालिका निवडणूक कधी होते याचे वेध लागले आहे. तर महायुती व महाविकास आघाडीतील अनेक राजकीय पक्ष हे महानगरपालिकेच्या निवडणुकीच्या तयारीलाही लागले असल्याचे पाहण्यात येत आहे.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

मंगळवार दिनांक ०३/१२/२०२४

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# 'मु.पो.बोंबीलवाडी' खळखळून हसवणार



दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुणे : विवेक फिल्म्स, मयसभा करमणूक मंडळीकृत परेश मोकाशी लिखित-दिग्दर्शित आणि मधुगंधा कुलकर्णी व दिलीप शितोळे निर्मित 'मु. पो. बोंबीलवाडी' नव्या वर्षात धमाल करणार आहे. या चित्रपटाचा टीझर नुकताच आला असून, १ जानेवारी २०२५ रोजी हा चित्रपट प्रदर्शित होत आहे. नवीन वर्षाची सुरुवात धमाल विनोदाने होणार आहे, याची खुणगाठ या टीझरमुळे पक्की होते.

पुण्यातील पत्रकार भवनात सोमवारी चित्रपटाचे निर्माते-दिग्दर्शक आणि कलाकारांनी चित्रपटाविषयी संवाद साधत मनमुराद गप्पा मारल्या. यावेळी प्रसिद्ध अभिनेते प्रशांत दामले, वैभव मांगले, आनंद इंगळे, सुनील अभ्यंकर, अद्वैत दादरकर, मनमित पेम, अभिनेत्री रितिका श्रोत्री आदी उपस्थित होते.

हरीशचंद्राची फॅक्टरी, एलिझाबेथ एकादशी, वाळवी या तीन मराठी चित्रपटांना मिळालेल्या राष्ट्रीय पुरस्कारांच्या हॅटट्रिकनंतर येणारा लेखक-दिग्दर्शक परेश मोकाशी आणि निर्माती मधुगंधा कुलकर्णी यांचा हा चित्रपट आहे. मोकाशी यांची विनोदाची पठडी आणि त्यांच्या 'मु. पो. बोंबीलवाडी' नावाच्याच नाटकावर बेतलेल्या या चित्रपटाकडून रसिकांच्या आशा खूप उंचावल्या आहेत. त्यातच चित्रपटात तगडी स्टारकास्ट असल्यानेही प्रेक्षकांची उत्कंठा शिगेला पोहचली आहे.

टीझरमध्ये अनेक गमतीशीर प्रसंग समोर येतात. हिटलरच्या भूमिकेतील प्रशांत दामले आणि इतरांच्या तोंडी धमाल संवाद आहेत आणि त्याची झलक या टीझरमध्ये दिसते. सांकेतिक भाषेत बोलतना हिटलर म्हणतो, "हाताशी..., तोंडाशी..., गळ्याशी...?" त्यावर समोरून प्रतिसाद येतो, "ओके ओके..., पाळे बोके..., खोक्यार खोके, बॉडीवर डोके...!". हिटलर त्यावर म्हणतो, "हांजी, हांजी...नाझी!"

इतरही पात्रांचे युद्ध, बॉम्ब यांसंबंधीचे अनेक मजेशीर संवाद समोर येतात. चित्रपट कोणत्या पठडीतील आहे, त्यावर त्यातून प्रकाश पडतो. परेश मोकाशी यांच्या आत्तापर्यंतच्या चित्रपटांप्रमाणेच 'मु. पो. बोंबीलवाडी'सुद्धा वेगळे आणि धमाल मनोरंजन देणार, याविषयीची खात्री त्यातून पटते. प्रशांत दामले हे चित्रपटात हिटलरच्या, तर आनंद इंगळे चर्चिलच्या भूमिकेत आहेत. त्यांच्यासह वैभव मांगले, गीतांजली कुलकर्णी, सुनील अभ्यंकर, मनमित पेम, रितिका श्रोत्री, प्रणव रावराणे, अद्वैत दादरकर, गणेश मयेकर, दीप्ती लेले, राजेश मापुस्कर हे चित्रपटसृष्टीतील आघाडीचे कलाकार चित्रपटात झळकणार आहेत. या चित्रपटाची निर्मिती मधुगंधा कुलकर्णी, विवेक फिल्म्सचे भरत शितोळे आणि मयसभा करमणूक मंडळी यांची असून लेखन-दिग्दर्शन परेश मोकाशी यांचे आहे.

# डॉक्टराची 28 लाखांची फसवणूक!

CRIME

शहरातील चिंचवड मधील एका डॉक्टराला सीबीआय अधिकारी बोलत असल्याचे भासवत त्याची 28 लाखांची फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. डॉक्टरांच्या क्रेडिट कार्ड वरून संशयित व्यवहार झाले असून त्याबाबत कारवाई न करण्यासाठी डॉक्टरकडून 28 लाख 35 हजार रुपये घेत फसवणूक करण्यात आली. ही घटना 28 नोव्हेंबर रोजी मोहन नगर ,चिंचवड येथे घडली.डॉ.भारत कांतीलाल शहा (वय,76 , रा.चिंचवड) यांनी पिंपरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यानुसार रवी कुमार आणि एक अनोळखी व्यक्ती यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रवी कुमार नाव सांगणाऱ्या व्यक्तीने डॉ.शहा यांना फोन केला. फोनवरून व्यक्तीने तो सीबीआय अधिकारी आहे, असे सांगितले. डॉक्टर शहा यांच्या क्रेडिट कार्डवरून एक कोटीची व्यवहार झालेले आहे, त्याबाबत त्यांना सर्वोच्च न्यायालयाची आणि ईडीची खोटी नोटीस मोबाईलवर पाठवली. या प्रकरणांमध्ये डॉ. शहा यांना अटक होण्यापासून वाचायचे असेल तर 20लाख रुपये भरावे लागतील, असे सांगितले. त्यानंतर इतर कारणे सांगून शहा यांच्याकडून एकूण 28 लाख 35 हजार रुपये घेत त्यांची फसवणूक केली. याबाबत अधिक तपास चिंचवड पोलीस करीत आहेत.


# काळेवाडी भागात दोन दुचाकींची धडक ; दुचाकीस्वार जखमी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी चिंचवड शहराच्या काळेवाडी मधील एम एम चौकात दोन दुचाकींची जोरात धडक झाली असल्याने यामध्ये एका दुचाकीस्वार जखमी झाला आहे. दुचाकीस्वाराचा गुडघा फॅक्चर झाला आहे.

ही घटना 19 नोव्हेंबर सायंकाळी घडली.सर्जेराव रंगराव पाटील (वय 57 ,रा. काळेवाडी) असे जखमी दुचाकीस्वाराचे नाव आहे.

त्यांनी याप्रकरणी काळेवाडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यानुसार अनोळखी दुचाकीस्वाराच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.फिर्यादी पाटील हे त्यांच्या दुचाकीवरून ज्योतिबा गार्डन कडे जात होते, एम एम चौकातून उजवीकडे वळण घेत असताना एम्पायर इस्टेट कडील बी आर टी मधून आलेल्या एका दुचाकीने पाटील यांना जोरात धडक दिली, याबाबत अधिक तपास काळेवाडी पोलीस करीत आहेत.



# पिंपरी चिंचवड शहराला उद्योगमंत्री मिळावा

## लघुउद्योग संघटनेची मागणी



दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी चिंचवड लघुउद्योग संघटनेचे पदाधिकारी यांनी देवेन्द्र फडणवीसांची मुंबईत जाऊन भेट घेतली व त्यांचेकडे पिंपरी चिंचवड औद्योगिक नगरीस उद्योगमंत्री पदि मळावे अशी मागणी केली. या भेटीमध्ये संघटनेचे अध्यक्ष – संदीप बेलसरे, संचालक – संजय सातव, प्रमोद राणे, नवनाथ वायाळ, भारत नरवडे, अतुल इनामदार, सचिन आदक, स्विकृत संचालक- श्रीपती खुणे यांचा समावेश होता.

पिंपरी चिंचवड शहर ही औद्योगिक नगरी म्हणून ओळखली जाते. पिंपरी चिंचवड महानगर पालिका व एम.आय.डी.सी. औद्योगिक परिसरात साधारणपणे 20 ते २५ हजार लहानमोठे उद्योग कार्यरत आहेत. त्यापैकी पिंपरी चिंचवड लघुउद्योग संघटनेकडे साधारणपणे ४५०० हजार लघुउद्योजक हे सभासद आहेत.

नोव्हेंबर २०२४ मध्ये पार पडलेल्या महाराष्ट्र विधान सभेच्या निवडणुकांमध्ये महायुतीला स्पष्ट बहुमत मिळालेले असून यामध्ये भोसरी, पिंपरी, चिंचवड, या विधानसभा मतदार संघाचा समावेश होतो. या तीनही विधानसभा मतदार संघातील महायुतीचे उमेदवार यांना पिंपरी चिंचवड लघुउद्योग संघटनेने जाहीर पाठींबा दिलेला होता. या तीनही विधानसभा मतदार संघातील महायुतीचे उमेदवार भरघोस मताधिक्याने विजयी झाले त्यामध्ये १) भोसरी- महेशदादा लांडगे २) पिंपरी- अण्णा बनसोडे ३) चिंचवड- शंकर जगताप तसेच विधानपरिषदेवर अमित गोरखे यांची निवड झालेली आहे.

या पिंपरी चिंचवड औद्योगिक परिसरातील सर्वच उद्योजक सभासदांची आपणास विनंती आहे की, या पिंपरी चिंचवड औद्योगिक नगरीतील एखाद्या तरी आमदाराला महाराष्ट्र राज्याचे उद्योगमंत्री पद आपल्या मंत्रिमंडळात द्यावे.

पिंपरी चिंचवड शहर हे उद्योगाचे शहर आहे आणि ते सर्व बाजूने कनेक्टीव्हिटी असल्याकारणाने पश्चिम महाराष्ट्र, नाशिक, अहिल्यानगर, संभाजीनगर, सातारा, कोल्हापूर या औद्योगिक परिसराला जवळच असल्याने उद्योजकांचे काही प्रोब्लेम असल्यास ते ताबडतोब सोडविण्यास मदत होईल. तसेच महाराष्ट्र राज्य उद्योगधंद्यात कायमस्वरूपी एक नंबरवर राहण्यास मदत होईल.

तरी या औद्योगिक नगरीतील एखाद्या आमदाराला आपल्या मंत्रिमंडळात उद्योगमंत्री पद मिळावे, असे सदर निवेदनात म्हंटले गेले आहे.